महा मेट्रो

PUNE METRO

**महामेट्रो तर्फे येरवडा येथे ३०० वृक्षांच्या रोपणाचे काम सुरु**

**दि. १०.०९.२०२० , गुरुवार :** महामेट्रो पुणे प्रकल्प हा पर्यावरणपूरक असून त्यामध्ये जास्तीत जास्त वृक्षांचे रोपण आणि वृक्षांचे पुनर्रोपण केले जाते. त्यामुळे पुणे शहराच्या सौंदर्यगीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संवर्धनाची योजना राबविण्याचे काम हाती घेण्यात आले.

महामेट्रो तर्फे आतापर्यंत एकुण १५५५० नवीन झाडांची तळजाई , आकुर्डी इको पार्क , सहयोग केंद्र, आकुर्डी मेट्रो इको पार्क, खराडी एफ एस ण. ७४, आर्मी कॅम्पस पिंपळे निलख , डेक्कन कॉलेज कॅम्पस या विविध ठिकाणी रोपण करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त मेट्रो कामात येणाऱ्या १८३४ झाडांना वाचविण्यात आले असून त्यांचे पुनर्रोपण कासारवाडी एस. टी. पी. , फॉरेस्ट ए. आर.ए. आय., अहमदनगर रोड साईड , डेक्कन एम्ब्रायरी , रेंज हिल , के. ई. एस. गुरुकुल , पी .डब्लू.डी ऑफिस , येरवडा ओपन जेल, बंड गार्डन , पीएमसी बंड गार्डन, नगर रोड, आरे डेरी बस स्टॅन्ड जवळ, आळंदी, एम.एस.आर.टी. बस डेपो , ॲग्री कल्चर कॉलेज , रेंज हिल, वनाज कचरा डेपो या ठिकाणी करण्यात आले आहे.

याच उपक्रमा अंतर्गत पावसाळी हंगामामध्ये येरवडा येथील तारकेश्वर टेकडी महादेव मंदीर परिसर, देवस्थान ट्रस्ट क्षेत्र येरवडा येथे वृक्षांचे रोपण यशस्वीरित्या करण्यात येत आहे. या वृक्षलागवडीमध्ये प्रामुख्याने स्थानिक प्रजातींची निवड केली आहे. त्यामध्ये सातवीन, कदंबा, बकुळ , जारूळ, बेल, उंबर, चाफा , कडुनिंब या जातीचे १२ ते १५ फूट उंचीचे महामेट्रो तर्फे एकूण 300 वृक्ष लावण्यात येणार आहे. आज दि. १०.०९.२०२० रोजी २०० झाडी लावण्यात आली व उर्वरित १०० झाडी ११.०९.२०२० रोजी लावण्यात येणार आहेत. मुद्दामहून मोठी झाडी (५ ते ६ वर्ष वयाची) निवडण्यात आली आहेत जेणेकरून त्यांची वाढ जोमाने होऊ शकेल. तसेच त्यांचे संवर्धनाचे कामही चालू राहणार आहे.

महामेट्रो पर्यावरण संवर्धनासाठी बांधील असून विविध उपाययोजनाद्वारे पर्यावरण संवर्धनाचे काम करत आहे.






